# भल्या पहाटे अर्धामसल्यात मशिदमध्ये स्फोट झाल्याची खळबळजनक घटना!


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564


## विटभट्टी चालकाचे अपहरण करुन खंडणी मागणारा जेरबंद

केज । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील एका वीटभट्टी मालकाचे २५ लाख रु. च्या खंडणीसाठी अपहरण करून खंडणी न दिल्यास कुटुंबाला जिवे मारण्याची धमकी दिलेल्या अपहरणकर्त्या पैकी एका गुन्हेगाराला केज पोलिसांनी शहरातून जेरबंद केले आहे. हा आरोपी केज शहरातील एका तृतीयपंथी सोबत रहात होता.

या बाबतची माहिती अशी की, दि. २९ मार्च रोजी केज येथील फुले नगर येथून ताब्यात घेतलेला आरोपी आकाश घुगे आणि त्याचे साथीदार यांनी दिनांक २२ मार्च रोजी रात्री ३:३० वा. च्या सुमारास जालना जिल्ह्यातील धानोरा येथील वीटभट्टी मालक निवृत्ती रामभाऊ तांगडे हे घरा बाहेर झोपलेले असताना त्यांचे चौघांनी एका पांढऱ्या रंगाच्या विनानंबरच्या स्कॉर्पिओ मधून अपहरण केले होते. अपहरणकर्त्यांनी तोंडाला रुमाल बांधलेले होते. निवृत्ती तांगडे यांना मधल्या सीटवर बसवून त्यांच्या बाजूला दोघेजण बसले होते. स्कॉर्पिओ गाडी मंठा जालना रोडवरील डुकरी पिंपरी टोल नाक्याच्या समोर आणुन अंधारात थांबवली. त्या नंतर अपहरणकर्त्यांनी निवृत्ती तांगडे यांच्या पँटच्या खिशातील पंधरा हजार रुपये बळजबरीने काढून घेतले आणि म्हणाले की, खंडणी म्हणुन २५ लाख रुपये द्यावे लागतील. नाही तर तुला व तुझ्या परीवाराला ठार मारुन टाकु. असे म्हणुन त्यांनी स्कॉर्पिओ गाडी ही घोडेगाव पाटी येथे थांबवुन तांगडे याला गाडी खाली उतरवले. तसेच जर आरडा ओरडा केला किंवा कोणाला माहिती दिली तर मारुन टाकु. असे म्हणुन ते चारही अनोळखी अपहरणकर्ते गाडीत बसुन निघुन गेले. पुन्हा दुपारी ३:३० वा. च्या सुमारास तांगडे यांना अनोळखी मोबाईल क्रमांका वरून फोन आला आणि सांगितले की, आम्ही सांगतो त्या ठिकाणी पैसे आणून दे. नाही तर परिवाराला मारून टाकण्याची धमकी दिली. या नंतर दि. २२ मार्च रोजी निवृत्ती तांगडे यांच्या तक्रारी नुसार जालना जिल्ह्यातील मौजपुर पोलीस ठाण्यात त्या अनोळखी अपहरणकर्त्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १९१ ■ रविवार दि.३० मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 191 ■ Sunday Dt. 30 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# मुस्लिम समाजाच्या रमजान आणि हिंदू धर्माच्या गुढीपाडव्याच्या दिवशी मस्जिद पाडण्याचा प्रयत्न!

## बीड जिल्ह्यात गुन्हेगारी करण्याचे धाडस वाढले; कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर

गेवराई । प्रतिनिधी

रमजान ईदच्या काही तास आधी गेवराई तालुक्यातील अर्धामसला गावातील मशिदीत पहाटेच्या सुमारास स्फोट झाला. या घटनेने एकच खळबळ उडाली. पोलिसांनी या प्रकरणात तातडीने तपासाला सुरुवात केली. आणि काही तासांतच आरोपींना अटक केली. घटनास्थळी पोलीस दलाचे बॉम्ब शोधक पथक आणि फॉरेन्सिक टीमही दाखल झाली होते. या दरम्यान, पोलिसांनी स्फोट प्रकरणात दोन तरुणांना ताब्यात घेतले आहे. श्रीराम सागळे व विजय गव्हाणे असे या आरोपीचे नावे आहेत.





**■ समाजकंटकाकडून जाणीवपूर्वक हिंदू-मुस्लिमात वाद घडवण्याचा प्रयत्न ■ समाजबांधवांनी कोणत्याही भूलथापांना बळी पडू नये शांतता राखावी**

**■ जिल्हा पोलिस प्रशासन ॲक्शन मोडवर; दोन आरोपींवर तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल ■ सणासुदीच्या काळात समाजबांधवांनी सलोखा कायम ठेवावा**

### सामाजिक सलोख्याची गुढी उभारून नवीन आदर्श निर्माण करा व शांतता राखा : आ. पंडित

मौजे अर्धमसाला येथे घडलेला प्रकार दुर्दैवी असुन त्याचा जाहीर निषेध करतो. बीड पोलिसांनी ही परिस्थिती अतिशय संवेदनशीलतेने व गांभीर्याने हाताळून पहाटेच त्यांनी आरोपींना अटक केल्याचे समजते. मुस्लिम धर्मियांसाठी रमजान ईद आणि हिंदू धर्मीयांसाठी गुढीपाडवा हे दोन्ही सण अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यामुळे काही समाजकंटक जाणीवपूर्वक दोन्ही समाजामध्ये दुरावा निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांचे असे प्रयत्न कधीच यशस्वी होणार नाहीत, याची मला खात्री आहे.आपण सर्वजण मिळून अशा समाजविघातक कृत्याचा निषेध करत सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्न करू.चला, आज सामाजिक सलोख्याची गुढी उभारून नवीन आदर्श निर्माण करू. कोणत्याही भूलथापांना बळी पडू नका, शांतता राखा. असे आवाहन गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

### मध्यरात्रीच्या सुमारास स्फोट!

गेवराई तालुक्यातील अर्धा मसला गावात एका मशिदीमध्ये स्फोट करण्यात आला. यात मशिदी मधील फरशी आणि बांधकामाला तडे गेले आहेत. मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास माथे फिरूने हे कृत्य केलं आहे. यामागील कारण अद्याप अस्पष्ट असून पोलिसांनी शांततेचे आवाहन केले आहे. हा स्फोट घडवण्यामागे आरोपीचा काय हेतू होता. त्याच्याकडे ही स्फोटकं कुठून आली, याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, या स्फोटात अद्याप कोणतीही जीवितहानी झाली नाही.





### पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत घटनास्थळी ठाण मांडून!



गेवराई तालुक्यातील अर्धामसला गावातील मशिदीत झालेल्या स्फोटाच्या घटनेचे गांभीर्य ओळखत विशेष पोलिस महानिरीक्षक संभाजी नगर परिक्षेत्र वीरेंद्र मिश्र यांनी घटनास्थळी भेट दिली. तर पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत हे घटनास्थळी ठाण मांडून बसले होते. तलवाडा पोलीस ठाण्यात दोन आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बॉम्ब शोधक पथक व फॉरेन्सिकचे पथकही घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी नमुने जमा केल आहेत. मशिदीतील स्फोट प्रकरणी गावातील दोन तरूणांना ताब्यात घेतले असून श्रीराम सागळे व विजय गव्हाणे असे नाव आहे.

# थकीत वीज बिलांचे कनेक्शन सणासुदीत कापू नका

## धनंजय मुंडे यांच्या महावितरणच्या अधिकाऱ्यांना सक्त सूचना

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

गुढीपाडवा, रमजान ईद आदी सणासुदीच्या दिवसांत परळी शहर व ग्रामीण भागातून विजेचा सातत्याने लपंडाव सुरू असल्याच्या तसेच काही भागात थकीत वीज बिलांसाठी कनेक्शन बंद केल्याच्या तक्रारी काही नागरिकांनी केल्या असून, ऐन सणासुदीच्या काळात विजेचा लपंडाव तातडीने थांबवून पूर्णवेळ वीज उपलब्ध करून द्यावी, अशा सक्तीच्या सूचना आज माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना केल्या आहेत.



धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत त्यांच्या परळी येथील संपर्क कार्यालयात महावितरणचे अधीक्षक अभियंता श्री. राजपूत यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. थकीत वीज बीलांचे कनेक्शन ऐन सणासुदीत कापू नयेत, त्याचबरोबर सणाच्या काळात सक्त वसुली बाबत गरजूंना थोडा अवधी वाढवून द्यावा, याबाबतही मुंडेंनी या बैठकीत सूचना केल्या. परळी मतदारसंघातील विविध प्रस्तावित व काम सुरू असलेल्या वीज उपकेंद्राच्या कामासह ट्रान्सफॉर्मरची मागणी, पुरवठा यांसह परळी मतदारसंघातील महावितरणच्या विविध कामांचा आढावा यावेळी धनंजय मुंडे यांनी घेत अधिकाऱ्यांना योग्य सूचना केल्या. यावेळी युवक नेते अजय मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, संचालक माणिकभाऊ फड, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, शिवसेना तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे, डॉ. संतोष मुंडे, कार्यकारी अभियंता श्री. चाटे, उपअभियंता श्री. राठोड यांसह पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# प्रसिद्ध वकील अविनाश गडले यांची कन्या सोनिया गंडलेची न्यायाधीशपदी निवड

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील प्रसिद्ध वकील अविनाश गंडले यांची कन्या सोनिया अविनाश गंडले यांची दिवानी न्यायाधीशपदी निवड झाली आहे. या निवडीबद्दल गंडले परिवारावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, लेकीने बीडची मान उंचावल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. घरात वडील वकील, आई मनिषा गंडले औरंगाबाद येथे अतिरिक्त जिल्हा वकील, चुलते महेंद्र गंडले हायकोर्टात वकील तर दोन मामा सुशीम वडमारे, विशाल वडमारे वकील अशी कुटुंबात सरवच कायद्याचे अभ्यासक असल्याने सोनिया अविनाश गंडले यांनी याच क्षेत्रात उतरण्याचा निर्णय घेतला.



१० पर्यंत बीड शहरातील चंपावती शाळेत शिक्षण घेतले यानंतर सरळ औरंगाबाद येथे एमपीला लॉ कॉलेज येथे बीएसएल, एलएलबी, एलएलएम असे कायद्याचे शिक्षण घेतले. यानंतर फक्त वकीली करण्यापर्यंत सोनिया गंडले यांनी विचारण करता शिक्षण पूर्ण होताच त्यांनी न्यायाधीश होण्याचे स्वप्न पाहून घरीच राहून अभ्यास सुरू केला. स्वअध्यायन करुन सन २०२२ मध्ये परीक्षा दिली अन् पहिल्याच प्रयत्नात यश संपादन करुन राज्यातून सहावा क्रमांक मिळविला. तर ओरल परीक्षा १८ मार्चला दिली यातही यश संपादन केले आणि काल शुक्रवारी (दि.२९) याचा अंतिम निकाल लागून सोनिया अविनाश गंडले यांची दिवानी न्यायाधीशपदी निवड झाली आहे.

या यशाबद्दल कुटुंबासह, मित्र परिवार, आप्तेष्ट, नातेवाईक यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तर सोनिया गंडले यांनी या परीक्षेच्या तयारीसह लिहण्याची अवड जोपासत 'ब्रेव्हसोल' हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाची राष्ट्रीय पातळीवर चर्चा सुरू आहे.

# छत्रपती मल्टीस्टेटच्या अध्यक्षांनी खातेदारांच्या सुखदु:खाला तरी पैसे द्यावे!

गेवराई । प्रतिनिधी

प्रत्येक नागरिक आपल्या गरजा वेळेवर पूर्ण व्हाव्यात म्हणून एक एक रुपया जमा करत असतों तसेच आपले कुटुंब सुखदु:खात अडचणीत सापडले तर आपण कमावलेले पैसे त्या अडचणीच्या वेळी आपण जमा केलेली रक्कम आपल्याला मिळेल ही अपेक्षा ठेवून नागरिक आपल्या जवळच्या सहकार्याने बँकेत पैसे जमा करतो पण तिथेही त्यांची फसवणूक होईल असे कदाचित त्याला वाटत नाही परंतु जमा केलेली रक्कम अडचणीच्या वेळी मिळावीत अशा अपेक्षेने सातत्याने पाठपुरावा करत असताना सौ.शोभा श्रीनाथ व मुलगा श्रावण श्रीनाथ यांनी अनेक वेळा छत्रपती मल्टीस्टेट यांच्याशी संपर्क साधला की आमच्या हक्काचे पैसे द्या आमच्या कुटुंबातील सदस्य सुभाष श्रीनाथ यांच्यावर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहे मात्र कर्मचारी वर्गासह संस्थेतील लोकांनी

## खातेदार श्रावण सुभाष श्रीनाथ यांचा अतोनात छळ

यांच्याकडे दुर्लक्ष केले.

सविस्तर वृत्त असे की छत्रपती मल्टीस्टेट चे खातेदार श्रावण सुभाष श्रीनाथ यांच्या वडिलांची तब्येत अत्यंत खालवली असुन गेल्या काही वर्षांपासून ते नेहमी त्रस्त आहेत जमा केलेली रक्कम हॉस्पिटल साठी कुठेतरी कामाला येईल अशी अपेक्षा खातेदाराला गरज होती मात्र झालं उलटेच खूपच सिरीयस सुभाष श्रीनाथ यांची तब्येत झाली तरीही या संस्थेने किमान सुखदुखात तरी खातेदारांचे पैसे द्यायला हवेसे होते श्रीनाथ यांच्या जीवांचे काही बरे वाईट झाल्यास बँकेतील संस्थाचालकासह कर्मचारी जबाबदार राहतील का? असा सवाल देखील उपस्थित होत आहे. अशी चर्चा त्यांच्या घरी होत असल्याचे निदर्शनास आले.

छत्रपती मल्टीस्टेट
वचन आमचे विश्वासाचे.. शिखर गाठू यशाचे..

# योगीराज प्रदीप जाधव यांची युवा सेना तालुका जाफ्राबाद समन्वयक पदी नियुक्ती



परतूर । प्रतिनिधी

हृदयसम्राट बाळासाहेबजी ठाकरे साहेब व धर्मवीर आनंदजी दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उप मुख्यमंत्री तथा बाळासाहेबांची शिवसेनेचे मुख्य नेते मा.श्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाने तसेच शिवसेना सचिव मा.श्री संजयजी मोरे साहेब मा. मंत्री तथा उपनेते आमदार मा.श्री अर्जुनरावजी खोतकर साहेब शिवसेना संपर्कप्रमुख मा.श्री पंडितरावजी भुतेकर साहेब व जालना जिल्हा प्रमुख मा.श्री भाऊसाहेब जी घुगे साहेब युवा सेना महाराष्ट्र राज्य सचिव मा .श्री अभिमन्यूजी खोतकर साहेब शिवसेना उपजिल्हाप्रमुख मा.श्री भूषण शर्मा साहेब युवा सेना जिल्हा प्रमुख म .श्री आमेल ठाकूर साहेब शिवसेना तालुका जाफ्राबाद प्रमुख मा .श्री दत्ता पाटील बंगाळे साहेब युवा सेना तालुका प्रमुख जाफराबाद मा.श्री बालाजी पा. पवार व शिवसेना जाफ्राबाद तालुका उपप्रमुख श्री प्रदीप शिवाजीराव जाधव यांच्या आदेशाने युवा सेना तालुका जाफ्राबाद समन्वयक श्री योगीराज प्रदीप जाधव व युवा सेना तालुका जाफ्राबाद उपप्रमुख श्री उमेश गायकवाड व युवा सेना जाफराबाद शहर प्रमुख श्री राजू भाई रमणे यांची नियुक्ती करण्यात आली.

### माझी शाळा, सुंदर शाळा अभियानांतर्गत तालुक्यातून

# नागनाथ विद्यालय प्रथम तर पिंपळवाडी विद्यालय द्वितीय

बीड । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा २०२४-२५ अभियानांतर्गत बीड तालुक्यात गुणानुक्रमाणे प्रथम मोरगाव येथील नागनाथ विद्यालय तर पिंपळवाडी विद्यालयाने द्वितीय क्रमांक मिळवला आहे.

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा २०२४-२५ अभियानांतर्गत मोरगाव येथील नागनाथ विद्यालयाचा प्रथम क्रमांक आला तर पिंपळवाडी विद्यालय, पिंपळवाडी या शाळेचा द्वितीय क्रमांक आला आहे. शाळेने मिळविलेल्या या यशाबद्दल आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम.ए.राऊत, कार्यालयीन अधिक्षक प्रकाश राठोड, नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक दत्तात्रय माटे, पिंपळवाडी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदिप जगताप, ग्रामस्थ मंडळी आणि शाळेच्या कर्मचार्यांनी अभिनंदन केले.




# बिहारमधील महाबोधी विहार मुक्तीसाठी संदेश आंबेडकर राष्ट्रपती द्रौपदी मूर्म यांना भेटणार

## डॉ .राजन मकणीकर यांनी दिली माहिती

बीड । प्रतिनिधी

मुंबई, बिहारमधील जागतिक प्राचीन आणि ऐतिहासिक बुद्धगया येथील महाबोधी विहार मुक्ती आंदोलन भिक्खू संघाच्या वतीने केले जात असून या घटनेची गंभीर दखल घेऊन लवकरच या प्रश्नावर भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्म यांची भेट राष्ट्रीय रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया संविधान पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदेश आंबेडकर घेणार असून पाठपुरावा करणार असल्याची माहिती पक्षाचे राष्ट्रीय महासचिव पॅन्थर डॉ. राजन माकणीकर यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे.

भारत देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४७ मध्ये नवीन कायदे अंमलात आले, त्यामध्ये जगामध्ये पवित्र म्हणून समजल्या जाणाऱ्या बिहारमध्ये महाबोधी विहार साठी




स्वतंत्र १९४९ वर्षी कायदा मंजूर झाला त्यामध्ये पाच ब्राह्मण आणि चार बौद्ध अशी वर्गवारी करून ती ट्रस्टी बनवण्यात आली. मात्र जगात पवित्र मानल्या जाणाऱ्या महाबोधी विहारात हिंदू ब्राह्मण धर्मीयांचा हा घुसखोरीचा प्रयत्न हाणून पाडलाच पाहिजे.

हिंदू मुस्लिम शिख धर्मियांमध्ये कुठेही हिंदू धर्माचे अतिक्रमण नाही. मग महाबोधी विहारामध्ये हिंदू ब्राह्मण हे कसे काय ट्रस्टी असू शकतात? असा सवाल डॉ. राजन माकणीणीकर यांनी केला आहे. त्यामुळेच ही गंभीर बाब भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्म यांची भेट घेऊन त्यांच्या निदर्शनास डॉ. बाबासहेब आंबेडकर यांचे मोठे पंतु श्रद्धेय संदेश आंबेडकर हे आणून देणार आहेत, असेही माकणीकर यांनी सांगितले. डॉ. राजन माकणीकर यांची लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्था महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांचे सर्वत्र स्वागत आणि अभिनंदन केले जात आहे.

# गुढीपाडवा म्हणजे काय आणि तो का साजरा केला जातो?

या दिवशी नवीन वस्तू खरेदी, व्यवसाय प्रारंभ, नव उपक्रमांचा प्रारंभ, सुवर्ण खरेदी इत्यादी गोष्टी केल्या जातात. दारी उभारलेली गुढी हे विजय आणि समृद्धीचे प्रतीक आहे असे मानले जाते. गुढी पाडव्यापासूनच राम जन्मोत्सवाच्या कार्यक्रमाचासुद्धा प्रारंभ होतो

गुढीपाडवा कसा साजरा करतात?

चैत्र शुद्ध प्रतिपदेला लवकर उठतात. स्नान करतात आणि सूर्योदयानंतर ही गुढी उभारतात. या दिवशी महाराष्ट्रात लोक घराच्या प्रवेशद्वारी उंचावर गुढी उभारतात. उंच बांबूच्या काडीला कडूनिंबाची डहाळी, काढीच्या वरच्या टोकाला रेशमी वस्त्र अथवा साडी गुंडाळतात, फुलांचा हार आणि साखरेची गाढी बांधून त्यावर तांब्या /धातूचे भांडे बसवले जाते, गुढीचा बांबू पाटावर उभा केला जातो, तयार केलेली गुढी दारात, उंच गच्चीवर लावतात. गुढीला गंध, फुले, अक्षता वाहतात व निरांजन लावून उदबत्ती दाखवतात. दुपारी गोडाचा नैवेद्य दाखवून संध्याकाळी पुन्हा हळद-कुंकू फुले वाहून गुढी उतरवली जाते. यादिवशी आनंद साजरा करीत आप्तेष्टांना नववर्षाच्या शुभेच्छा, गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या जातात. चैत्र शुद्ध प्रतिपदा हा दिवस कर्नाटक आणि आंध्र प्रदेश अशा गौतमीपुत्राची सत्ता असलेल्या राज्यांत स्वातंत्र्य प्राप्तीचा आनंद झाल्यामुळे विजयदिन म्हणून संवत्सर पाडवो वा उगादी अशा वेगवेगळ्या नावांनी व वेगवेगळया पद्धतीने साजरा करण्यात येतो. प्रामुख्याने महाराष्ट्रात या सणाला गुढीपाडवा असे संबोधले जाते. सिंधी लोक चेटीचंड नावाने या उत्सवाला संबोधतात.

अन्य धार्मिक विधी –

दैनंदिन कर्मे झाल्यावर गुढी उभारली जाते. वर्षप्रतिपदेच्या दिवशी विघ्नहर्त्या गणपतीचे,



देवादिकांचे स्मरण, पूजन करतात. गुरू, वडीलधाऱ्यांना वंदन करावे, अशीही रूढी आहे. त्यानंतर संवत्सर फल श्रवण करावे, असा संकेत रूढ आहे. संवत्सर फल म्हणजे काय? तर त्या पाडव्यापासून जे संवत्सर म्हणजे वर्ष सुरू होत असते, त्या वर्षाच्या पहिल्या दिवशी आणि नंतरच्या काही विशिष्ट दिवशी असणारी स्थिती – जसे वार, चंद्र, नक्षत्र, सूर्याचे विविध नक्षत्रप्रवेश इत्यादी संदर्भांवरून हे संवत्सर फल दिलेले असते. संवत्सर फलात देशकालाचाही निर्देश असतो, म्हणजे देशाच्या कोणत्या भागात सुखसमृद्धी असेल ते संवत्सर फलात त्रोटकपणे सांगितलेले असते.

वर्षप्रतिपदेच्या म्हणजे गुढीपाडव्याच्या दिवशी जो वार असेल त्या वाराचा जो ग्रह असेल तो त्या संवत्सराचा अधिपती असे मानले जाते. म्हणजे आजपासून सुरू होणारे वर्ष हे जर मंगळवारी सुरू होत असेल तर मंगळ हा त्या वर्षाचा अधिपती असे समजले जाते. साठ संवत्सरांची वेगवेगळ्या पद्धतीने विभागणी केली आहे. एका विभागणीत पाच संवत्सरांचे एक युग अशा पद्धतीने साठ संवत्सरांची बारा युगे मानली जातात. तसेच संवत्सर चक्रातील ८व्या भाव नावाच्या संवत्सरापासून विजय या २७व्या संवत्सरापर्यंत २० संवत्सरांचा स्वामी पालनकर्ता विष्णू आहे असे मानले जाते.

ब्रह्मदेवाने पहिली तिथी सर्वात श्रेष्ठ म्हणून घोषित केली. तिला पहिले पद मिळाल्याने ती 'प्रतिपदा' म्हणून ओळखली जाते असे मानले जाते. या तिथीला 'युगादी' तिथी असेही म्हणतात.या दिवशी उपाध्यायाकडून पंचांग श्रवण म्हणजेच वर्षफल श्रवण करतात. या पंचांग श्रवणाचे फळ असे सांगितले आहे.

वर्षारंभाची धार्मिक कृत्ये करावीत

चैत्र हा अधिकमास असता, काहींच्या मते अधिकमासाच्या शुद्ध प्रतिपदेस वर्षारंभाची धार्मिक कृत्ये करावीत; तर काहींच्या मते ती शुद्ध किंवा निज चैत्राच्या प्रतिपदेस करावी, असा मतभेद आहे. याविषयी धर्मसिंधूने निर्णय दिला आहे तो असा– अभ्यंगस्नानादी कृत्ये अधिक मासाच्या शुद्ध प्रतिपदेसच करावी; पण गुढी उभारणे, कडुलिंबाची पाने खाणे, पंचांग श्रवण करणे या गोष्टी शुद्ध चैत्राच्या प्रतिपदेस कराव्या.

महाभारतातील उल्लेख –

महाभारताच्या आदिपर्वात उपरिचर राजाने इंद्राने त्याला दिलेली कळकाची काठी इंद्राच्या आदरार्थ जमिनीत रोवली आणि दुसऱ्या दिवशी म्हणजे नववर्ष प्रारंभीच्या दिवशी तिची पूजा केली. या परंपरेचा आदर म्हणून अन्य राजेही काठीला शेल्यासारखे वस्त्र लावून, ती शृंगारून, पुष्पमाला बांधून तिची पूजा करतात. महाभारतातच खिलपर्वात कृष्ण त्याच्या संवगड्यांना इंद्रकोपाची पर्वा न करता वार्षिक शक्रोत्सव (इंद्रोत्सव) बंद करण्याचा सल्ला देतो. महाभारत ग्रंथातल्या आदिपर्वात हा उत्सव वर्ष प्रतिपदेस करण्यास सुचवले आहे तर खिलपर्वातून आणि इतर संस्कृत ग्रंथांतून हा उत्सव साजरा करण्याच्या तिथी वेगवेगळ्या दिलेल्या दिसतात.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या अध्यक्षपदी संदीप वायवळ

परभणी । प्रतिनिधी



प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी परमपूज्य, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वि जयंती परभणी शहरामध्ये मोठा उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. त्याच अनुषंगाने भिमाकोरेगाव मित्र मंडळ परभणी च्या वतीने याही वर्षी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. दि.२८/०३/२०२५ रोजी सेवानिवृत्त तहसिलदार करामत खान, यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक भिमाकोरेगाव चौक येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी भिमाकोरेगाव मित्र मंडळ चे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. परमपूज्य, भारतरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ व्या जयंती अध्यक्षपदी संदीप भैय्या वायवळ यांची निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्ष ओम साळवे, अर्जून लोंढे, सचिव दिनेश गायकवाड, सहसचिव विकास टोंगराज, कोषाध्यक्ष सुनील लोणकर, सल्लागार वसीम मोमीन, समन्वयक प्रमोद अंभोरे, अशी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

भिमाकोरेगाव चौक जयंती उत्सव समिती २०२५ या बैठकीमध्ये नूतन अध्यक्ष संदीप भैया वायवळ यांनी बोलताना सांगितले की, जयंती हि सामाजिक उपक्रमांनी साजरी होणार असल्याचे यावेळी सांगितले.

पान १ वरून...

## गुढीपाडव्याच्या दिवशी मशिद पाडण्याचा प्रयत्न!

मागील महिन्यांपासून बीड जिल्हा हा विविध कारणांनी चर्चेत आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड जिल्ह्यातील वातावरण ढवळून निघाले. या प्रकरणनंतर बीडमधील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला. त्यातच रमजान ईदच्या काही तास आधीच मशिदीत स्फोट झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. बीड जिल्ह्यात गुन्हेगारी करण्याचे धाडस वाढले असून यावर कडक कारवाई होणे गरजेचे आहे. तसेच काही समाजकंटकाकडून जाणीवपूर्वक हिंदू-मुस्लिमात वात घडवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे काही नागरिकांकडून बोलले जात आहे. यामुळे जनतेने कोणत्याही भूलथापाला बळी पडू नये, आणि शांतता राखावी असे सांगितले जात आहे. जिल्हा प्रशासन क्शन मोडवर येऊन दोन आरोपींवर तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सणासुदीच्या काळात सलोखा कायम ठेवावा असे आव्हान पोलिसांकडून केले जात आहे.

# प्रत्येकाने आपल्या धर्माचे पालन केलेच पाहिजे : श्रीहरी महाराज रसाळ

## शौर्य आणि पराक्रमाचे प्रतीक धर्मवीर छत्रपती संभाजीराजे

गेवराई । प्रतिनिधी

संतांनी नेहमीच धर्माचे पालन करण्याची शिकवण दिली. धर्मवीर छत्रपती संभाजीराजांनी प्रसंगी आपल्या प्राणाचे बलिदान दिले परंतु धर्म सोडला नाही. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत. प्रत्येकाने आपल्या धर्माचे पालन केलेच पाहिजे. धर्म टिकला तरच आपले अस्तित्व आहे, त्यामुळे धर्माचा ऱ्हास होऊ देऊ नका. छत्रपती संभाजी महाराज हे असामान्य शौर्य व त्यागाचे मूर्तिमंत स्वरूप आहेत असे प्रतिपादन शिव कथाकार ह.भ.प. श्रीहरी महाराज रसाळ यांनी सावतानगर येथे चालू असलेल्या शिवमहापुराण कथेत छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनाच्या निमित्ताने केले.



या बाबत सविस्तर वृत्त असे की, शहरातील सावतानगर येथे भव्य संगीतमय श्री शिव महापुराण कथा चालू असून यामध्ये असंख्य नागरिकांच्या उपस्थितीमध्ये छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. शिव महापुराण कथेतील सहाव्या दिवशीचे अनेक प्रसंग भावीक भक्ताला सांगत संपते ती व्यक्ती असते, पण जो हजारो वर्ष कोणाच्या ना कोणाच्या डोक्यात आणि हृदयात जिवंत राहतो तो असतो विचार त्यामुळे धर्मवीर छत्रपती संभाजीराजे यांचे विचार कोणी ही मिटवू शकत नाही. स्वराज्यरक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची संपूर्ण कारकीर्द तेजोमय होती. अगदी लहान असल्यापासून त्यांच्यावर अनेक संकटे आली. त्या संकटांवर पाय रोवून उभे न राहता संभाजी महाराजांनी समर्थपणे झेपही घेतली. छत्रपती शिवाजी महाराजांनंतर स्वराज्याची धुरा सक्षमपणे आपल्या हातात घेऊन संपूर्ण राजवटींना तोंडात बोटे घालायला लावणारा प्रचंड पराक्रम संभाजी महाराजांनी केला. छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच अनेक मोहिमा संभाजी राजेंनी यशस्वीपणे राबवल्या. कोणत्याही मोहिमेत त्यांना कधीच अपयश आले नाही. छत्रपती संभाजी महाराजांना टक्कर देईल, असा योद्धा तत्कालीन हिंदुस्थानात नव्हता असेही ह.भ.प. श्रीहरी महाराज रसाळ यांनी सांगितले. यावेळी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या घोषणांनी सावतानगर परिसर दुमदुमून गेला होता. या प्रसंगी पुरुषांसह महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. सकाळच्या सत्रातील ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणास ही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद असून ज्ञानेश्वरी पारायण व कथेची सांगता सोमवार दि. ३१ मार्च रोजी होणार आहे. ह.भ.प. श्रीहरी महाराज रसाळ यांचे काल्याचे किर्तन होणार असून महाप्रसादाने कथेची सांगता होणार आहे. या श्री शिव महापुराण कथेचा पंचक्रोशीतील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सर्व आयोजन कमिटीच्या वतीने वतीने करण्यात आले आहे.

# लिंबागणेशकरांनी नाकारली गुढी; गुढी ऐवजी फडकविला शंभुराजेंचा भगवा ध्वज




लिंबागणेश । प्रतिनिधी

तोडले मी बंधन, गाडल्या त्या रूढी, माझ्या शंभुराजांच्या नावाने उभारा भगवी पताका लावून गुढी अशा शुभेच्छांची देवाण घेवाण करत मागील काही वर्षांपासून परिवर्तनवादी गुढी उभारण्यास सुरुवात झाली आहे. याही वर्षी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचे चित्र असलेले भगवे ध्वज गावोगावी लावण्यात आले आहेत. भगवी पताका हिच आमुची खरी गुढी आता नाही लटकविणार घरावर साडी; अशुभ आहे तो उलटा तांब्या,मयतालाच लागतात कडुनिंबाच्या फांद्या, तिरडीला बांधतो एरंडाची काठी, सोडा मायबापहो फक्त आपल्या शंभुराजासाठी जय जिजाऊ जय शिवराय जय शंभुराजे.

गुढीपाडव्याच्या पुर्व दिवशी छत्रपती संभाजी महाराजांची हत्या झाली होती. त्यामुळे बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील बहुतांश बहुजण कुटुंबियांनी पारंपरिक गुढी न उभारता आज दि.३० रविवार रोजी आपल्या घरांवर भगवी पताका उभारून छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले. गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी संभाजी महाराजांची हत्या झाली. त्यामुळे हा दिवस अशुभ आहे. एवढेच नव्हे तर मंगलकार्यात कलश सरळच असतो पण नेमका गुढीपाडव्यालाच उलटा का टांगला जातो, कुटुंबातील एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर कडुनिंबाचा पाला घरी आणला जातो. एवढेच नव्हे तर बाबुंचा वापर हा तिरडीसाठी केला जातो. या सगळ्या बाबी छत्रपती संभाजी महाराजांच्या हत्येशी संबंधित असुन अशुभ आहेत. त्यामुळे गुढीऐवजी घरावर भगवा ध्वज फडकावुन छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन करावे असा मेसेज सोशल मिडीयातुन व्हायरल होत आहे. शहराबरोबरच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर परिवर्तन दिसून येत आहे.

# पोहरागड येथील अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याला लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा : राठोड

गेवराई । प्रतिनिधी

बंजारा समाजासह वंचित, उपेक्षित, शेतकरी, ऊसतोड कामगार बांधवांची काशी समजल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र पोहरागड येथे दि.५ एप्रिल, रविवार रोजी अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याचे आयोजन सर्व संत महंतांच्या व बंजारा समाजातील प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत करण्यात आले असून समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवहान बंजारा ब्रिगेडचे गेवराई तालुकाध्यक्ष अमोल राठोड यांनी केले आहे.



अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याला धर्मगुरू आमदार बाबुसिंग महाराज, महंत कबीरदास महाराज, महंत सुनील महाराज, महंत जितेंद्र महाराज, महंत रमेश महाराज,महंत शेखर महाराज, महंत यशवंत महाराज, महंत खुशाल महाराज, प्रकाश महाराज यांच्यासह भारतभरातून येणाऱ्या प्रमुख बंजारा नेत्यांची उपस्थिती राहणार आहे. या मेळाव्याला बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत भाऊ राठोड हे मार्गदर्शन करणार असून मागील अनेक वर्षापासून देशपातळीवरील अनेक समस्यांना बंजारा समाज तोंड देत असून त्याकडे शासन प्रशासनाचे लक्ष वेधन्यासाठी तसेच महाराष्ट्रासह आता देशपातळीवर सामाजिक एकजुटीचा निर्णय घेण्याची वेळ आली असल्याने भारतातील १५ कोटी बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरागड येथे अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले असून या ठिकाणी महाराष्ट्रासह १३ ते १४ राज्यातील बंजारा बांधवांची उपस्थिती राहणार आहे. या अभूतपूर्व ऐतिहासिक मेळाव्याचे साक्षीदार होण्यासाठी महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यातील बंजारा समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने या जनजागृती मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन बंजारा ब्रिगेडचे गेवराई तालुका अध्यक्ष अमोल राठोड यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# जन सुरक्षा विधेयक रद्द करा, आझाद क्रांती सेनेची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

दिनांक २९ मार्च २०२५ रोजी आझाद क्रांती सेनेच्या वतीने तहसीलदार मार्फत श्री. जितेंद्र भोळे, सचिव (१) (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन, मुंबई यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे. माजलगाव तहसील कार्यालयाच्या समोर तीव्र निदर्शने करून जनक सुरक्षा विधेयक कायद्याची होळी करण्यात आली. सविस्तर वृत्तांत असे की, सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भंग करणारे असून, घटनेच्या मुलभूत अधिकारांविरोधात असल्याने सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३, ज्याअंतर्गत व्यक्ती व संघटना यांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न केला जात आहे, हे विधेयक अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा आणणारे आणि भारतीय संविधानातील अनुच्छेद १९ मध्ये दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारे आहे. हे विधेयक अत्यंत व्यापक आणि अस्पष्ट व्याख्या वापरून व्यक्ती व संघटनांवर कठोर निर्बंध लावण्याचा प्रयत्न करत असून, त्याचा गैरवापर राजकीय, सामाजिक आणि विचारसरणीच्या आधारे दडपशाही करण्यासाठी केला जाऊ शकतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे कोणत्याही लोकशाही देशाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असून, त्यावर कोणत्याही प्रकारची बंधने लादणे हा लोकशाही मूल्यांचा आणि नागरिकांच्या हक्कांचा अवमान आहे.



या विधेयकामुळे पुढील गंभीर परिणाम होऊ शकतात. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गंभीर परिणाम :नागरिकांना त्यांचे मत मांडण्यास किंवा सरकारच्या धोरणांवर टीका करण्यास अडथळा निर्माण होईल, जो संविधानाने दिलेल्या हक्कांच्या विरोधात आहे. पत्रकारिता आणि माध्यम स्वातंत्र्य धोक्यात : स्वतंत्र पत्रकार, मीडिया संस्था आणि सोशल मीडियावरील विचारप्रवर्तक यांना या विधेयकाचा गैरवापर करून लक्ष्य केले जाऊ शकते. सामाजिक चळवळींना धोका : सामाजिक संघटना व एनजीओ यांच्या वैध आंदोलनांवर निर्बंध येऊन जनतेच्या न्याय मागण्यांवर अन्यायकारक मर्यादा येऊ शकतात. विधेयकातील अस्पष्टता आणि अधिकारांचा गैरवापर : विवक्षित बेकायदेशीर कृत्ये ही संकल्पना नीट स्पष्ट न करता दिल्यामुळे प्रशासन आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना अवास्तव अधिकार मिळतील, ज्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य आणि मूलभूत अधिकार धोक्यात येतील. लोकशाही प्रक्रियेला धोका: या विधेयकामुळे लोकशाही मूल्यांवर परिणाम होईल आणि नागरिकांचा सरकारवर प्रश्न विचारण्याचा हक्क मर्यादित केला जाईल.

सुझाव आणि मागणी हे विधेयक पूर्णतः रद्द करण्यात यावे. या विधेयकाबाबत व्यापक जनसुनावणी घ्यावी आणि नागरी समाज, तज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ आणि मानवाधिकार कार्यकर्त्यांचे मत विचारात घ्यावे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, माध्यम स्वातंत्र्य आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्याच्या दृष्टीने नवीन कायद्यांचे मसुदे तयार करताना संविधानिक तज्ज्ञांची मदत घ्यावी. या विधेयकामुळे महाराष्ट्रातील नागरी हक्क, लोकशाही मूल्ये आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गंभीर परिणाम होईल. त्यामुळे आम्ही महाराष्ट्र सरकारला आणि विधानमंडळ समितीला आग्रहपूर्वक विनंती करतो की, हे विधेयक रद्द करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे या निवेदनावरती आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे, माजलगाव तालुकाप्रमुख अशोक ढगे, आझाद क्रांती सेना ज्येष्ठ नेते भिसे सर, कैलास गायकवाड, संजय हिवाळे, अरुण पिसोळे, राहुल गायकवाड, हनुमान गायकवाड आदी आझाद सैनिक उपस्थित होते.

# आला उन्हाळा स्वतःला सांभाळा

## उन्हाळ्यातील आजार, आहार आणि काळजी

मार्च महिन्यात सुरू झालेल्या उन्हाळ्याची तीव्रता एप्रिल आणि मे या महिन्यात वाढतच जाते. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणे, अशक्तपणा वाढणे, काम कमी केले तरी जास्त दमायला होणे तसेच घामावाटे पोषक द्रव्ये शरीराबाहेर टाकली जाणे ह्या बाबींची देखील सुरुवात होते. तापमान बदल व वाढत्या उष्णतेमध्ये पुरेशी काळजी घेतली नाही तर उन्हाळ्यामुळे उद्भवणार्या समस्यांचा सामना करावा लागू शकतो. भारतातील महत्तम तापमान आणि सर्वाधिक उष्ण ठिकाणे : भारतामध्ये सर्वाधिक तापमान राजस्थान आणि विदर्भ प्रदेशात नोंदवले जाते. भारतातील सर्वाधिक तापमान ५१ओउ फाळोडी, राजस्थानमध्ये मे २०१६ मध्ये नोंदविल्या गेले होते.

फाळोडी (राजस्थान), चुरू (राजस्थान), नागपूर (महाराष्ट्र), चंद्रपूर (महाराष्ट्र), गंगानगर (राजस्थान), जगदलपूर (छत्तीसगड) ही सर्वाधिक उष्ण ठिकाणे आहेत. महाराष्ट्रात उष्णतेचा प्रभाव मुख्यतः विदर्भ आणि मराठवाडा भागांमध्ये अधिक जाणवतो. महाराष्ट्रातील सर्वाधिक तापमान ४९ओउ चंद्रपूरमध्ये मे २०२३ मध्ये नोंदविल्या गेले. अकोला, यवतमाळ, परभणी, जालना येथेही उच्च तापमान आढळते. उन्हाळयामुळे उद्भवणार्या समस्यांमध्ये प्रामुख्याने अतिसारासारखे पचनक्रियेशी संबंधित आजार आणि उष्माघात यांचा समावेश होतो. याशिवाय त्वचेसंदर्भात समस्या देखील उद्भवतात. जशी उष्णता वाढते तशी पचनक्रिया मंदावू शकते. त्याशिवाय वारंवार बाहेरचे खाणे हा शहरी जीवनशैलीमधील एक नियमित भाग झाला आहे. त्यातच उघड्यावरील किंवा अस्वच्छ अन्न, द्रवपदार्थ खाण्या-पिण्यात आले की पचनाशी संबंधित आजार उद्भवतात. विशेष करून अतिसार. अस्वच्छ किंवा दूषित अन्नावर विषाणू, जीवाणू हे जास्त वेळ टिकून राहतात. यामुळे सर्व वयोगटातील लोकांवर याचा प्रभाव पडू शकतो. विशेष करून पाच वर्षांखालील बालके आणि साठ वर्षावरील लोकांमध्ये याचा जास्त परिणाम जाणवतो. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यावर ते पुन्हा पुर्ववत आणण्याची क्षमता या वयोगटातील लोकांमध्ये कमी असल्याने परिणाम जास्त दिसून येतात. यावर उपाय म्हणजे सर्वांनी दोन पध्दतीने आपली काळजी घेतली पाहिजे. पहिले म्हणजे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन न देणे आणि दुसरे म्हणजे विनाकारण उन्हामध्ये बाहेर न जाणे. कामानिमित्त बाहेर जायचे असेल तर छत्री, टोपी, हेल्मेट हे उन्हाळ्यातील सुरक्षा कवचांसारखे आहे.

या सुरक्षा कवचामधील सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे आपल्या घरातील स्वच्छ पाणी. बाहेर जाताना स्वतःची पाण्याची बाटली घेऊन निघावे. त्याचबरोबर सैलसर, सुती व फिकट रंगांचे कपडे उन्हाळ्यात शक्यतो घालावेत.

उन्हाळ्यात त्वचेची कशी काळजी घ्याल :

- सूर्याच्या किरणांपासून संरक्षण करण्यासाठी चेहरा मऊ कापडाने बांधून घ्या
- त्वचेच्या डेड सेल्स वेळोवेळी काढून टाकाव्यात
- त्वचा हायड्रेट ठेवण्यासाठी भरपूर पाणी प्या आणि फळांचं सेवन वाढवा
- उन्हाळ्यात दोन वेळा आंघोळ करणं फायद्याचं ठरू शकत
- उन्हाळ्यात चेहऱ्यावर तेल जास्त स्त्रवतं, अशावेळी सतत चेहरा धुवा

शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होण्याला डीहायड्रेशन म्हणतात. जेव्हा शरीरातून द्रवपदार्थ जास्त प्रमाणात बाहेर पडतात तेव्हा ही स्थिती उद्भवते. ही स्थिती उन्हाळयात सामान्य असते. कारण, आपल्या शरीरातून घामावाटे किंवा लघवीवाटे पाणी बाहेर जात असते आणि तेवढ्या प्रमाणात पाणी शरीरात गेले नाही तर तहान वाढते. शहरी जीवनशैलीमध्ये समस्या वाढविणारा भाग म्हणजे वारंवार बाहेरचे व तेलकट, मसालेदार अन्न खाणे. धकाधकीच्या आणि गतिशील जीवनशैलीमध्ये घरातून डबा आणण्याचे प्रमाण देखील कमी होत चालले आहे. परिणामी रस्त्यावरील उघडे अन्न खाल्ल्यास पचनक्रियेशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. प्रत्येकालाच चटकदार पदार्थ खायला आवडतात. परंतु किमान उन्हाळयात तरी थोडी सावधगिरी बाळगावी.

कोरोनाच्या काळात लॉकडाऊनमध्ये आपण घरचेच अन्न खात होतो. हीच सवय पुढे सुरू ठेवायला काय हरकत आहे. ज्या व्यावसायिकांना मीटिंग्सना किंवा कुठल्या कामानिमित्त बाहेर पडावे लागते, त्यांनी लांबचा प्रवास करताना मध्ये विश्रांती घेऊन पाणी पित राहावे, जेणे करून पाण्याचे प्रमाण कमी होणार नाही. शहरातील अनेक कार्यालये आता वातानुकुलित आहेत, पण बाहेरच्या तीव्र तापमानामधून लगेचच कार्यालयात जाऊन वातानुकुलित यंत्रणा सुरु करू नये. थोडा वेळ जाऊन द्यावा आणि मग सुरु करावी. मोठ्या कार्यालयांमध्ये जेथे मध्यवर्ती वातानुकुलित यंत्रणा असते तिथे आत जाण्याआधी काही मिनिटे सावलीत थांबून मग आत जावे. ऑफिसमधून बाहेर पडताना देखील तेच करावे. शरीरातील पाण्याचे प्रमाण चांगले ठेवल्यास उन्हाळयातील अनेक समस्यांपासून आपण दूर राहू शकतो. नारळाचे पाणी, साखर व बर्फविरहीत फळांचे रस घ्यायला हरकत नाही. परंतु फळांचा रस घेताना तेथील स्वच्छतेची खात्री करून घ्यावी. कार्बोनेटेड पेय टाळावे.

उन्हाळा आणि शेतकरी : उन्हाळ्यात बीड, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी स्वतःची काळजी घेण्यासाठी, उन्हाळ्यातील उष्णतेपासून बचाव करण्यासाठी योग्य कपडे, पाणी आणि योग्य आहार घेणे आवश्यक आहे. तसेच, कामाच्या वेळेत बदल करून, सावलीत काम करणे आणि जनावरांनाही पाण्याची सोय करणे महत्त्वाचे आहे.

उष्णतेपासून बचाव करण्यासाठी शक्यतो पांढरे किंवा हलक्या रंगाचे कपडे घालावे, जे उष्णता शोषून घेत नाहीत.

डोके आणि शरीर झाका, टोपी किंवा रुमाल डोक्यावर आणि शरीराचा जास्तीत जास्त भाग झाका. भरपूर पाणी प्या, विशेषतः मातीच्या भांड्यात पाणी प्यावे. गरम पेये टाळा, चहा आणि इतर गरम पेये टाळा. उन्हाळ्यातील तीव्र उष्णता टाळण्यासाठी कामाचे तास सकाळी लवकर आणि दुपारनंतर थोड्या वेळाने करा. शक्य असल्यास सावलीत काम करा. उन्हाळ्यात फळभाज्या आणि पालेभाज्या जास्त खाव्यात. आहारात जास्त पाणी असलेले पदार्थ घ्या. जनावरांना पुरेसे पाणी द्या. जनावरांच्या आहारात प्रथिन आणि पाणी यांचे प्रमाण वाढवा. पिकांची काळजी घेताना उन्हाळी पिके म्हणजे काकडी, टरबूज, खरबूज, भेंडी, कारले, वांगी, उडीद, मूग, भोपळा आणि टोमॅटो यांसारखी पिके उन्हाळ्यात घेता येतात. रोपे लावण्यापूर्वी त्यांना ५-६ दिवस आधी चिलेटेड कॅल्शिअमने फवारणी करा. खत आणि पाण्याची योग्य व्यवस्था करा. उन्हाळ्यात शेत नांगरल्यास मातीची रचना सुधारते आणि सूक्ष्मजीवांसाठी चांगली जागा तयार होते.

उन्हाळा आणि विद्यार्थी : विद्यार्थ्यांनी उन्हाळ्यात स्वतःची काळजी घेत असतानाच विविध मनोरंजक आणि ज्ञानवर्धक उपक्रम आयोजित करता येतात, जसे की कला कार्यशाळा, विज्ञान प्रयोग, पुस्तक क्लब, खेळ आणि प्रवास. विद्यार्थ्यांनी दररोज काही वेळ वाचायला किंवा पुस्तकांवर चर्चा करण्यासाठी वेळ काढावा. विविध विषयांवर ऑनलाइन अभ्यासक्रम घेऊन ज्ञान वाढवावे. चित्रकला, शिल्प, संगीत किंवा नृत्य यांसारख्या कला प्रकारांमध्ये सहभागी व्हावे. घरी किंवा शाळेत सोप्या विज्ञानाचे प्रयोग करावे. नवीन भाषा शिकावी किंवा आपल्या आवडीच्या भाषेत प्रभुत्व मिळवावे. प्रखर ऊन नसताना क्रिकेट, फुटबॉल, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, टेनिस यांसारखे खेळ खेळावे. कुटुंबासोबत किंवा मित्रांसोबत वेगवेगळ्या ठिकाणी स्वतःची काळजी घेत फिरावे. शैक्षणिक किंवा मनोरंजक शिबिरात सहभागी व्हावे. गरजूंना मदत करण्यासाठी किंवा स्वच्छतेसारखे उपक्रम करावे. संगीत आणि नृत्य शिकावे. बँड, थिएटर ग्रुप किंवा नृत्य गटात सामील व्हावे. अशा प्रकारे उन्हाळा सुसह्य होऊ शकतो.



**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
तहसीलदार, बीड.

उष्माघात म्हणजे काय : उष्णतेमुळे शरीर तापमान नियंत्रित करणारी यंत्रणा बिघडते आणि शरीरातील पाणी व क्षार (सॉल्ट्स) कमी होतात. त्यामुळे शरीराचे तापमान अनियंत्रितपणे वाढते आणि काही गंभीर समस्या निर्माण होतात. यालाच उष्माघात (हीट स्ट्रोक) म्हणतात.

उष्माघाताची लक्षणे : प्रचंड थकवा आणि अशक्तपणा, प्रचंड तहान आणि तोंड कोरडे पडणे, डोके दुखणे, चक्कर येणे, शरीराचे तापमान खूप वाढणे, रक्तदाब कमी होणे, उलट्या, मळमळ, गरगरणे, जास्त झोप येणे किंवा बेशुद्ध पडणे इत्यादी लक्षणे उष्माघातात दिसतात.

उष्माघात झाल्यास घ्यावयाची काळजी :

१. व्यक्तीला सावलीत किंवा थंड जागी हलवा.
२. शरीर थंड करण्यासाठी ओल्या कापडाने पुसा किंवा थंड पाण्याचा स्पंज लावा.
३. थंड पाणी किंवा इलेक्ट्रोलाइटयुक्त द्रव (जळ्ढ, ताक, लिंबूपाणी) द्या.
४. घाम येत नसेल तर डॉक्टरांकडे त्वरित जा.
५. बेशुद्ध झाल्यास त्वरित वैद्यकीय मदत घ्या.

उष्माघात टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी :

१. भरपूर पाणी प्या: दिवसातून ८-१० ग्लास पाणी प्या.
२. हलका आणि सूती कपडे वापरा: गडद रंगाचे कपडे टाळा.
३. थंड पदार्थांचा आहार घ्या: ताक, फळांचे रस, लिंबूपाणी, नारळपाणी यांचा समावेश करा.
४. उष्णतेत बाहेर जाणे टाळा: सकाळी ११ ते दुपारी ४ च्या दरम्यान गरज नसल्यास बाहेर पडू नका.
५. टोपी किंवा छत्रीचा वापर करा: उन्हात बाहेर जाताना टोपी, गॉगल आणि छत्री वापरा.
६. जड पदार्थ टाळा: मसालेदार, तेलकट आणि गरम पदार्थ कमी खा.
७. थंड ठिकाणी विश्रांती घ्या: शक्य असल्यास उन्हात जास्त वेळ न राहता सावलीत रहा.
८. लहान मुले आणि वृद्धांची विशेष काळजी घ्या: ते उष्णतेला जास्त संवेदनशील असतात.

सारांश : उन्हाळ्यात शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी पुरेसा पाणीपुरवठा, योग्य आहार आणि सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. उष्माघात टाळण्यासाठी स्वतःची आणि आपल्या कुटुंबाची योग्य काळजी घ्यावी.

# प्रशासनाला बीडमध्ये होर्डिंग दुर्घटना घडवायचीय काय ?

## स्टेडियम परिसरातील सिद्धीविनायक कॉम्प्लेक्सवर बसवलेले होर्डिंग धोकादायक

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील वर्दळीचे ठिकाण असलेल्या स्टेडियम परिसरातील महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याच्या पाठीमागे असलेल्या सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स वरील जाहिरातीचे होर्डिंग धोकादायक ठिकाणी लावण्यात आले असून, ते तात्काळ काढून टाकण्यात यावे अशी मागणी, सामाजिक कार्यकर्ते शुभम प्रधान यांनी केली आहे.

काही दिवसांपूर्वी मुंबई येथे होर्डिंगची अत्यंत मोठी घटना घडली होती. पेट्रोल पंपावर होर्डिंग पडल्याने यात अडकून अनेकांचा मृत्यू झाला होता. तसेच दुर्घटना बीड स्टेडियम परिसरातील सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स वर बसवलेल्या होर्डिंगच्या बाबतीत घडू शकेल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.




महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याच्या मागच्या बाजूवरील सिद्धिविनायक कॉम्प्लेक्सवर क्लासेसच्या जाहिरातीचे भले मोठे होर्डिंग बसवण्यात आले आहे. प्रथमेश डिजिटल च्या नावाने कुलकर्णी यांचे हे होर्डिंग असल्याची माहिती मिळाली आहे. सदरील होर्डिंगला कोणताही मोठा आधार देण्यात आलेला नसून, वादळ वारे आले तर हे होर्डिंग पडू शकते. जर हे भले मोठे होर्डिंग खाली पडले तर यातून मोठी दुर्दैवी घटना घडू शकते. यासाठी ते तात्काळ हटविण्याची गरज आहे. खरंतर या एवढ्या मोठ्या होर्डिंगला वरदळीच्या ठिकाणी बसविण्याची परवानगी द्यायला नको होती. मात्र प्रशासनाला होर्डिंग दुर्घटना घडवून आणायची आहे की काय, असा प्रश्न पडला आहे. या ठिकाणी वाहनांची मोठी वर्दळ असते शिवाय नागरिक ही या ठिकाणी बसलेले असतात. यासाठी यासाठी तिथे काळजी घेण्याची गरज आहे. सदरील होर्डिंग ताबडतोब हटवून, संभाव्य दुर्घटना टाळावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शुभम प्रधान यांनी केली आहे.

### होर्डिंग उखडून टाका - शुभम प्रधान यांची मागणी

# पोलीसांवर जिवे मारण्याच्या उद्देशाने खुनी हल्ला करणाऱ्या वाळू माफियांची जामीन फेटाळला

बीड । प्रतिनिधी



सुरळेगांव शिवारातील गोदावरी नदी पात्रात दोन ट्रॅक्टर व एक लोडर वाळु चोरी करीत असल्याची माहिती दि. २७/०२/२०२५ रोजी सायंकाळच्या सुमारास चकलांबा पोलीसांना मिळाल्यामुळे तेंव्हा गोदावरी नदी पात्रात पोलीस गेले असता तेथे एक लोडरच्या सहाय्याने दोन ट्रॅक्टरमध्ये वाळु भरत होते, त्याशेजारी दोन हायवा वाळु भरत होते, त्यांना पोलीसांनी ताब्यात घेतले व सदरील वाहने पोलीस स्टेशन चकलांबा येथे घेवून येत असतांना १) सुनिल नरवडे, २) घनश्याम नरवडे, ३) संभाजी नरवडे, ४) शंभु नामदेव आरबड व त्यांच्या सोबत एक अनोळखी ईसम सर्व रा. बळेगांव ता. अंबड जि. जालना या सर्वांनी पोलीस शिपाई इंगोले व पोशि प्रशांत घोंगडे यांना मारहाण करून जिवे मारण्याच्या उद्देशाने त्याच्या अंगावर लोडर घातले त्यामुळे ते गंभीर जखमी होवून फिर्यादीचे हात फॅक्चर झाले होते. त्यामुळे उपरोक्त आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन चकलांबा येथे आरोपींविरूध्द कलम २१ (१), २१ (२) खाण आणि खनिज (नियमन आणि विकास) अधिनियम १९५७ व १०९, ११५ (२), १२१(२), १३२, १८९(२), १९०, १९१(२), ३०३(२) भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ नुसार पो.शि. श्री. इंगाले यांच्या फिर्यादीरून गुन्हा नोंद केला. सदर आरोपीपैकी सुनिल नरवडे व शंभु नामदेव आरबड यांनी मा. जिल्हा व सत्र न्यायालय, बीड येथे अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी अर्ज केलेला होता.

सदरील अर्जावर सुनावणी होवून फिर्यादीच्या वकीलाचा युक्तीवाद ग्राह्य धरून आरोपींचा मा. न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला. फिर्यादीतर्फे ॲड. संतोष गहिनीनाथ घोलप यांनी काम पाहिले तर त्यांना सहकार्य ॲड. पठाण खालेक, ॲड. नितीन पवार यांनी सहकार्य केले.

## ऑल इंडिया पँथर सेनेच्या मराठवाडा युवक अध्यक्षपदी अमोल वाघमारे



अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये नव्याने उदयास येत असलेल्या ऑल इंडिया पँथर सेनेच्या मराठवाडा युवक आघाडीच्या अध्यक्षपदी अंबाजोगाई येथील युवा नेते तथा सामाजिक चळवळीमध्ये सक्रीय असणारे व्यक्तीमत्व अमोल वाघमारे यांची निवड राष्ट्रीय अध्यक्ष दिपकभाई केदार यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आली.

गुरुवार दिनांक २७ मार्च रोजी अंबाजोगाई येथील शासकीय विश्रामगृहात ऑल इंडिया पँथर सेनेच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या आढावा बैठकीला दीपकभाई केदार, बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नितीन भोळे, युवक प्रदेशाध्यक्ष बंटी शिंदे व ऑल इंडिया पँथर सेनेचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. ऑल इंडिया पँथर सेनेच्या मराठवाडा युवकच्या अध्यक्षपदी निवड झाल्याने अमोल वाघमारे यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.



ग्रामपंचायत कार्यालय नेकनूर तर्फे रोजा इफ्तारचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ह.भ.प लक्ष्मण महाराज मेंगडे, शाबेर मौलाना, सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्यांसह शेकडो हिंदू -मुस्लिम बांधव या इफ्तार पार्टीला उपस्थित होते.





कडा : आष्टी येथील माही ऊबेद पठाण या चिमुकलीने वयाच्या ७ व्यावर्षी तर उमेश काझी यानी ६ व्या वर्षी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पुर्ण केल्याबद्दल तीचे कौतुक होत आहे.

# सरकारने आरक्षण वर्गीकरण लागू करावे, अन्यथा राज्यातील शासकीय नौकर भरती थांबवावी

### सामाजिक कार्यकर्ते अशोक साबळे ; त्या आरोपींना कायदेशीर फासावर लटकवा आणि आरक्षण वर्गीकरण विधेयक मंजूर करा

परतूर । प्रतिनिधी

दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आरक्षण वर्गीकरण निर्णयाच्या पार्श्वभुमिवर महाराष्ट्र सरकारने निर्गमित केलेल्या आरक्षण वर्गीकरण शासन निर्णया नुसार महाराष्ट्र शासनाने राज्यात अनुसूचित जातीच्या प्रवर्गात तात्काळ आरक्षण वर्गीकरणाची आमलबजावणी करावी अन्यथा राज्यातील शासकीय नौकर भरती थांबवावी. तसेच परभणी येथील घटनेतील त्या आरोपींना कायदेशीर फाशीची शिक्षा झालीच पाहिजे. या प्रमुख मागणीसाठी समाज बांधवांनी मोर्च्यात सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते अशोक साबळे यांनी केले. परतूर येथील होऊ घातलेल्या ८ एप्रिल रोजीच्या बालिका अत्याचार निषेधार्थ आणि आरक्षण वर्गीकरण आमलबजावणीच्या मोर्चा संबधित प्रचार प्रसार आणि जनजागृती निमित्त सामाजिक कार्यकर्ते अशोक साबळे यांनी पिंप्रुळा येथील गावातील बांधवांना संबोधित केले आणि परतूर येथील आयोजित मोर्च्यात हजारोच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन केले.



पुढे बोलतांना अशोक साबळे म्हटले की, राज्य शासनाने सर्वोच्य न्यायालयाच्या आरक्षण वर्गीकरण शासन निर्णयानुसार बदर समिती गठीत केली आहे. बदर समितीला तीन महिन्यात अहवाल द्यावा, असे निर्णयात दिले असताना देखील बदर समितीने मुदतीत अहवाल दिला नाही. समितीच्या या चालढकल पणामुळे आरक्षण वर्गीकरण प्रकरणात मोठ्या प्रमाणात दिरंगाई होत असल्याने परिणामी समाजातील गरजू विद्यार्थ्यांना याचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक आणि शासकीय नौकर भरतीसाठी नुकसान ठरणार आहे. सरकारने कोणत्याही प्रकारचा विलंब नलावता राज्यात तात्काळ आरक्षण वर्गीकरण लागू करावे, अन्यथा राज्यातील शासकीय नौकर भरती थांबवावी. तसेच परभणी येथील अल्पवयीन बालिकेवर घडलेली घटना माणुसकीला काळीमा फासणारी असून संबधित आरोपींना कायदेशीर फाशीची शिक्षा झालीच पाहिजे. याकरीता ङखढचौकशी नेमून जलदगत न्यायालयात खटला चालवावा आणि पिढीत बालिकेचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी यावेळी अशोक साबळे यांनी केले.

## उत्तरेश्वर गव्हाणे यांना रसायनशास्त्रात पीएच.डी. प्रदान

बीड । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील खापरवाडी उर्फ रत्नापुर, येथील उत्रेशवर अर्जुन गव्हाणे यांना नुकतीच पुण्यातील भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था, पुणे (आयसर) यांच्याकडुन पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे. उत्रेशवर गव्हाणे यांची शैक्षणिक पार्श्वभूमी उल्लेखनीय असून, त्यांनी रसायनशास्त्र या विषयात सेट, नेट जीआरएफ आणि गेट या प्रमुख परीक्षांमध्ये यशस्वी कामगिरी केली आहे.

उत्रेशवर गव्हाणे यांनी शास्त्रज्ञ डॉ. एम. जयकण्णन यांच्या मार्गदर्शनाखाली ''डेवलपमेंट ऑफ ल-



टायरोसिन बेस्ड पॉलीमर ब्रशेस फॉर ड्रग डिलिव्हरी इन विट्रो अँड इन विवो एप्लिकेशन'' या विषयावर शोधप्रबंध सादर केला. या संशोधनामध्ये त्यांनी अत्याधुनिक पद्धतीने पॉलिमर्स विकसित केले असून, या पॉलिमर्सचा उपगोय कॅन्सर या रोगावरती केला आहे. उत्रेशवर गव्हाणे यांचे संशोधन कार्य जागतिक स्तरावरील प्रमुख शोधप्रबंध प्रकाशनांमध्ये, जसे की अमेरिकन केमिकल सोसायटी (एसीएस) आणि रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री (आरएससी), प्रसारित झाले आहे. त्यांनी अनेक इंटरनेशनल आणि नेशनल कॉन्फरन्स मध्ये आपले साइंटिफिक वर्क प्रेझेंटेशन दिले आहे आणि त्यांच्या कार्यासाठी इस्रो मधील कॉन्फरन्समध्ये त्यांना सर्वोत्तम सादरीकरणासाठी प्रथम पारितोषिक मिळाले, ज्यामुळे त्यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. वैज्ञानिक संशोधन क्षेत्रामध्ये उत्रेशवर गव्हाणे यांच्या संशोधनाचे विशेष कौतुक होत आहे. भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था, मधील शास्त्रज्ञांनी त्यांचे कार्य पाहून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# शाश्वत विकासाच्या दिशेने कन्हेरवाडीचे एक पाऊल पुढे

## राजेभाऊ फड व श्रीराम मुंडे यांच्या उपस्थितीत नवीन पाणीपुरवठा योजनेचे लोकार्पण

### नागरिकांना शुद्ध आणि मुबलक पाणी मिळणार निःशुल्क

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे कन्हेरवाडी गावाने शाश्वत विकासाच्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकले आहे. मराठी नववर्ष आणि गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर गावासाठी नवीन पाणीपुरवठा योजनेचे लोकार्पण करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड तसेच गावातील ज्येष्ठ नेते श्रीराम मुंडे यांच्या उपस्थितीत श्रीफळ वाढवून या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. ग्रामस्थांच्या उपस्थित हा लोकार्पण सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला. गावातील नागरिकांसाठी याचा मोठा फायदा होणार असून या योजनेमुळे नागरिकांना मुबलक प्रमाणात शुद्ध पाणी निःशुल्क स्वरूपात मिळणार आहे.



कन्हेरवाडी गावासाठी नवीन पाणीपुरवठा योजना गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर सुरू करण्यात आली. याप्रसंगी बोलत असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा सरपंच राजेभाऊ फड म्हणाले गावच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. नागरिकांना स्वच्छ आणि पुरेसे पाणी देण्याचे वचन आम्ही दिले होते, ते आज पूर्णत्वास आले असून त्याचा आपल्याला मनस्वी आनंद आहे. नवीन पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून पाण्याच्या टाकीचे तसेच जलशुद्धीकरण प्रकल्पाचे बांधकाम करून घरोघरी नळ जोडणी देण्यात आलेली आहे. त्याद्वारे गावातील नागरिकांना मुबलक प्रमाणात स्वच्छ पाणी पुरवठा करण्यात येत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. नवीन पाणीपुरवठा योजनेच्या लोकार्पण कार्यक्रमास सरपंच राजेभाऊ फड, से स सो व्हाईस चेअरमन तथा जेष्ठ नेते श्रीरामजी मुंडे, पोलिस पाटील प्रल्हाद मुंडे, माजी उपसरपंच रामहारी फड, विलास बापु मुंडे, नाथराव फड ग्रा.प. सदस्य प्रल्हाद गीते, ग्रा.प.सदस्य प्रशांत रोडे, पिंटू फड, अमोल रोडे, गुनाजी फड, मधुकर मुंडे, बंडू मुंडे, महादेव मामा मुंडे, अंकुशराव धोबले, बाबासाहेब मुंडे, प्रवीण रोडे, श्रीकृष्णा फड, ऋषिकेश फड, ज्ञानेश्वर फड, समाधान मुंडे आदि उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT